**नव्या वाटा**

**महेश नरके**

# मटेरिअल्स मॅनेजमेंट करिअर्स

अमेरिकेमध्ये पर्चेस मॅनेजमेंट अर्थात खरेदी व्यवस्थापन, सप्लाय चेन मॅनेजमेंट, लॉजिस्टिक्स मॅनेजमेंट या क्षेत्रातील करिअर्सना उत्तम प्रतिसाद लाभला आहे. म्हणूनच या क्षेत्रातील व्यावसायिक मनुष्यबळाच्या निर्मितीकरिता अनेक अभ्यासक्रमांची रचना तसेच शास्त्रशुद्ध संशोधनाद्वारे मटेरिअल्स मॅनेजमेंट हे एक प्रमुख रोजगार देणारे क्षेत्र म्हणून समोर येत आहे. भारतामध्ये अजूनही पर्चेस डिपार्टमेंट, स्टोअर्स व्हेंडर डेव्हलपमेंट, सप्लायचेन मॅनेजमेंटसाठी यात प्रशिक्षित मनुष्यबळाशिवाय काम (बहुतेक ठिकाणी) चालविले जाते. ज्या उत्पादन क्षेत्रामध्ये जवळजवळ ५०-६० टक्के खर्च कच्चा तसेच इतर मालाच्या खरेदीवर होतो, ती खरेदी किफायतशीरपणे होण्यासाठी निश्चितच व्यवस्थापकीय कौशल्ये आणि तंत्र अवगत असणे क्रमप्राप्त आहे.

या क्षेत्रामध्ये प्रवेश करण्यासाठी प्रामुख्याने दोन मार्ग उपलब्ध आहेत.

**अ) एम.बी.ए. (ऑपरेशन्स/ मटेरिअल्स मॅनेजमेंट)**

कालावधी- २ वर्षे- पूर्ण वेळ

पात्रता- कोणत्याही शाळेची पदवी

प्रवेश : प्रवेश परीक्षेद्वारे

**ब) पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन बिझनेस मॅनेजमेंट (ऑपरेशन्स/ मटेरिअल्स मॅनेजमेंट)**

कालावधी- २ वर्षे - (अर्धवेळ)

पात्रता- कोणत्याही शाखेची पदवी.

**क) इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मटेरिअल्स मॅनेजमेंट :** ही या क्षेत्रामध्ये काम करणारी स्वयंशासित संस्था असून, या संस्थेद्वारे विविध अभ्यासक्रम राबविले जातात, ते पुढीलप्रमाणे-

**१) ग्रॅज्युएट डिप्लोमा इन मटेरिअल्स मॅनेजमेंट**

कालावधी : ३ वर्षे (डिस्टन्स एज्युकेशन)

२ वर्षे (रेग्युलर कोर्स)

पात्रता : कोणत्याही शाखेचा पदवीधर अगर अभियांत्रिकी पदविका (बारावीनंतर केलेला असावा)

हा अभ्यासक्रम केंद्र सरकारच्या मनुष्यबळ विभागाकडून मान्यताप्राप्त असून, पदोन्नतीसाठी ग्राह्य धरण्यात येतो.

**२) पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन मटेरिअल्स मॅनेजमेंट-**

कालावधी- ३ वर्षे (डिस्टन्स एज्युकेशनद्वारा)

पात्रता- ५० टक्के मार्कांसह कोणत्याही शाखेचा पदवीधर तसेच दोन वर्षांचा कार्यानुभव आवश्यक. अगर ग्रॅज्युएट डिप्लोमा + २ वर्षांचा कार्यानुभव इन मटेरिअल्स

ए.आय.सी.टी.ई. द्वारा मान्यताप्राप्त अभ्यासक्रम असून, वरिष्ठ व्यवस्थापकीय पदांसाठी उपयुक्त.

**३) सर्टिफाईड परचेसिंग मॅनेजर (सी.पी.एम.)**

इन्स्टिट्यूट फॉर सप्लाय मॅनेजमेंट, अमेरिका आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मटेरिअल्स मॅनेजमेंट यांच्याद्वारे संयुक्तपणे हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम देशात उपलब्ध आहे.

पात्रता : कोणत्याही शाखेचा पदवीधर अगर जी. डी. एम. एम. + पाच वर्षांचा पर्चेस / सप्लाय चेन क्षेत्रामधील कार्यानुभव

अभियांत्रिकी पदविका + ८ वर्षांचा पर्चेस सप्लाय चेन क्षेत्रामधील कार्यानुभव.

अभियांत्रिकी पदवी अगर पदव्युत्तर पदवी + ३ वर्षांचा पर्चेस / सप्लाय चेन क्षेत्रामधील कार्यानुभव.

**४) डिप्लोमा इन इंटरनॅशनल ट्रेड**

कालावधी १ वर्ष

पात्रता- कोणत्याही शाखेचा पदवीधारक अगर अभियांत्रिकी पदविका + २ वर्षांचा कार्यानुभव.

**५) ग्रॅज्युएट डिप्लोमा इन पब्लिक प्रोक्युटमेंट**

कालावधी - १ वर्ष.

पात्रता- कोणत्याही शाखेचा पदवीधारक अगर अभियांत्रिकी पदविका (१२ वीनंतर प्रवेश घेतलेला असावा.)

सरकारी, निमसरकारी संस्था, उद्योगांमधील कर्मचाऱ्यांकरिता तसेच खासगी उद्योग जे सहकारी संस्था, उद्योगांना पुरवठा करतात यांच्यासाठी उपयुक्त.

**६) पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन लॉजिस्टिक्स मॅनेजमेंट.**

कालावधी : १ वर्ष

पात्रता : अभियांत्रिकी पदवी + २ वर्षांचा कार्यानुभव इतर पदवी + ३ वर्षांचा कार्यानुभव.

**७) डिप्लोमा इन स्टोअर्स मॅनेजमेंट**

कालावधी : १ वर्ष

पात्रता : कोणत्याही शाखेची पदवी अगर अभियांत्रिकी पदविका अगर बारावी + २ वर्षांचा कार्यानुभव

**८) पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन सप्लायचेन मॅनेजमेंट**

कालावधी : २ सत्रांचा पदविका अभ्यासक्रम (डिस्टन्स एज्युकेशन द्वारा)

४ सत्रांचा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम- (डिस्टन्स एज्युकेशन द्वारा))

पात्रता : कोणत्याही शाखेचा पदवी अगर पदव्युत्तर पदवीधारक (५० टक्के गुणांसह)

वरीलपैकी बहुतेक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश दर वर्षी जानेवारी आणि जुलै महिन्यामध्ये दिला जातो.



**मटेरिअल मॅनेजमेंट रिटेल शॉप्स, मॉल्समधील आवश्यक बाब बनली आहे.**

Edumantra